**बॉम्बे चष्माघर**
गल्ली नं.५, पारोळारोड कॉर्नर, धुळे
फोन : 235222, मो.9021853108


# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.१९७ ■ सोमवार २० एप्रिल २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.No./DHL/53/24-26


**आकर्षक लग्न पत्रिका**
उत्तम क्वॉलिटी व उत्कृष्ट दर्जेची लग्न पत्रिका प्रिंटींग सह तसेच गिफ्ट पाकीट व फॅन्सी कार्ड शिट होलसेल भावात मिळण्याचे एकमेव ठिकाण
**श्रीहरि पेपर प्रॉडक्टस्**
"कार्ड हाऊस", गल्ली नं.५, धुळे
मो.94239 28900

## बदलत्या हवामानामुळे मनुष्याच्या जीविताला धोका राज्यात वादळी वाऱ्यासह दमदार पावसाची शक्यता

**नवी दिल्ली, दि.१९- भारतात दमट-उष्ण हवामान बदलाचे सर्वात धोकादायक रूप बनत चालले आहे. हे वाढते तापमान व जास्त आर्द्रता असे याचे समीकरण आहे, ज्यामध्ये शरीर घामाच्या माध्यमातून स्वत:ला थंड करू शकत नाही. जर्नल क्लायमेट डायनॅमिक्समधील अभ्यासानुसार केरळमध्ये याचा जास्त धोका आहे. पश्चिम महाराष्ट्रातील घाट परिसर, खान्देश, मराठवाडा आणि विदर्भाच्या काही भागांमध्ये वीस ते बावीस एप्रिल दरम्यान दुपारनंतर काही प्रमाणात मेघगर्जनेसह वादळी पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. या कालावधीत वीजांचा कडकडाट, पाऊस तसेच काही ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता नाकारता येत नाही.**



भारतात आतापर्यंत उष्णतेच्या लाटेची ओळख मुख्यत्वे तापमानाच्या मर्यादेवरून केली जात असे. परंतु अभ्यासानुसार, केवळ तापमानावरून खरा धोका समजत नाही. जास्त आर्द्रतेमध्ये घाम लवकर सुकत नाही, शरीराची कुलिंग सिस्टम निकामी होते. शरीराचे मुख्य तापमान वाढते आणि काही प्रकरणांमध्ये काही तासांत उष्माघात होऊ शकतो. अशा परिस्थितीत जास्त आर्द्रतेमध्ये मध्यम तापमान देखील जीवघेणे ठरू शकते. युकेच्या युनिव्हर्सिटी ऑफ रीडिंगच्या अक्षय देओरस यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या संशोधनात ऐंशी वर्षांहून अधिक काळातील हवामान डेटाचे विश्लेषण केले.

धोक्याची वेळ व ठिकाण ठरवण्यात दक्षिण-पश्चिम मान्सूनची मोठी भूमिका आहे. देओरस यांच्या मते मान्सूनच्या पद्धतीचा चार आठवडे आधीपर्यंत अंदाज लावला जाऊ शकतो. जेव्हा मान्सून आपल्या सक्रिय टप्प्यात असतो. तेव्हा मध्य आणि उत्तर भारतात मुसळधार पाऊस पडतो. या काळात हवेतील आर्द्रता (उकाडा) **(पान ४ वर)**

## राज्यात १७ लाख कर्मचारी उद्यापासून संपात सहभागी

मुंबई, दि.१९- प्रलंबित मागण्यांसाठी मंगळवारपासून राज्यातील सरकारी कर्मचाऱ्यांनी संपावर जाण्याचा इशारा दिला आहे. सरकारने तातडीने निर्णय न घेतल्यास तब्बल लाख कर्मचारी रस्त्यावर उतरणार असल्याचे सांगण्यात आले. संपामुळे सरकारी कार्यालयांचे कामकाज ठप्प होण्याची शक्यता आहे. तसेच शाळा, महाविद्यालये, रुग्णालये आणि अन्य अत्यावश्यक सेवांवरही मोठा परिणाम होऊ शकतो.अनेक दिवसांपासून सरकारी कर्मचारी विविध मागण्यांसाठी सरकारकडे पाठपुरावा करत आहेत. या मागण्यांमध्ये चतुर्थश्रेणी आणि वाहन चालकांच्या भरतीवरील बंदी उठवणे, कंत्राटी कर्मचाऱ्यांचे नियमितीकरण करणे आणि सर्व कर्मचाऱ्यांना **(पान ४ वर)**

## मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्यासाठी शिरपुरमध्ये जय्यत तयारी भरगच्च कार्यक्रम; वास्तुंची उद्घाटने, पाहणी, भेट

**शिरपूर दि.१९ (का.प्र.)- राज्याचे माजी शिक्षणमंत्री तथा आमदार अमरीशभाई पटेल यांचा ड्रीम प्रोजेक्ट असलेल्या एसव्हीकेएम संचलित तपनभाई मुकेशभाई पटेल मेमोरिअल हॉस्पिटल, मेडिकल कॉलेज व संशोधन केंद्राचे उद्घाटन करण्यासाठी शिरपुरात येणाऱ्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दौऱ्यासाठी जय्यत तयारी सुरु आहे. या दौऱ्यात ना.फडणवीस यांच्याहस्ते विविध संस्थांच्या वास्तूंची उद्घाटने, पाहणी आणि भेट अशा भरगच्च कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे.**

शनिवारी २५ एप्रिलला मुख्यमंत्री शिरपूर दौऱ्यावर येत आहेत. एसव्हीकेएमचे अध्यक्ष





आमदार अमरिशभाई पटेल, सह-अध्यक्ष भूपेशभाई पटेल यांच्या संकल्पनेतून तालुक्याच्या आरोग्य सुविधेसाठी तपनभाई मुकेशभाई पटेल मेमोरियल हॉस्पिटल, मेडिकल कॉलेज व संशोधन केंद्र उभारण्यात आले आहे. त्यातील १२०० बेडच्या अत्याधुनिक मल्टीस्पेशालिटी व सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे उदघाटन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी मंत्री हसन मुश्रीफ, मंत्री गिरीष महाजन, पालकमंत्री जयकुमार रावल, मंत्री संजय सावकारे यांच्यासह धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील आमदार उपस्थित राहणार आहेत. उद्घाटन समारंभासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन एन.एम.आय.एम.एस. अभिमत विद्यापीठाचे कुलपती आमदार अमरिशभाई पटेल, आमदार काशिराम पावरा, माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल, नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल यांनी केले आहे. मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्याच्या नियोजनानुसार, **(पान ४ वर)**

## धुळ्यातील एकवीरा देवी मंदिराच्या जिर्णोध्दारास वेग गाभारा, सभामंडप नुतनीकरणास मुहूर्तावर सुरूवात

**धुळे, दि.१९- शहरातील एकवीरा देवी मंदिराच्या जीर्णोध्दारातील तिसऱ्या टप्प्याच्या कामास सुरूवात झाली. तिसऱ्या टप्प्यात मंदिराचा गाभारा आणि सभा मंडपाच्या नूतनीकरणाचे काम करण्यात येत आहे. अक्षयतृतीयेच्या मुहूर्तावर मंदिराच्या जीर्णोध्दाराच्या तिसऱ्या टप्प्याच्या कामाचा शुभारंभ वंजारी समाजाचे अध्यक्ष भीमराव गोरे यांच्या हस्ते झाला. यावेळी शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि युवा सेनेचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.**



धुळ्यातील एकवीरा देवी मंदिराच्या जीर्णोद्धाराचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. माजी पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे यांनी पर्यटन निधीतून सुमारे तीन कोटी रुपयांचा निधी या कामासाठी मंजूर केला आहे. त्यासाठी युवासेनेचे सहसचिव पंकज गोरे यांनी प्रयतक केले. पहिल्या टप्प्यात मंदिराचे मुख्य प्रवेशद्वार दक्षिणात्य पद्धतीने उभारण्यात आले. गोपूर स्वरूपात असलेले हे **(पान ४ वर)**

## होर्मुझ मधून दोन तेल जहाजे परत

तेहरान, दि.१९- आयआरजीसी अर्थात इस्लामिक रिव्हॉल्युशनरी गार्ड कॉर्प्स या इराण लष्कराचा भाग असलेल्या नौदलाने होर्मुझ सामुद्रधुनी पार करत असलेली दोन तेल जहाजे परत पाठवली आहेत. आयआरजीसीशी संलग्नित असलेल्या तस्नीम वृत्तसंस्थेने ही माहिती दिली आहे. होर्मुझ सामुद्रधुनीमध्ये इराणच्या नौदलाने नाकेबंदी सुरू केली आहे. इराणच्या सशस्त्र दलाने रविवारी दोन तेल जहाजांना परत पाठवले. तस्नीम वृत्तसंस्थेने रिपोर्टमध्ये म्हटले आहे की, ही तेल जहाजे रविवारी होर्मुझ सामुद्रधुनी पार करण्याच्या प्रयत्नात होती. त्यांना नौदलाच्या सशस्त्र जवानांनी परत माघारी जाण्यास सांगितले.

## शिंदखेडा तालुक्यात चिकुनगुनियाच्या उद्रेकाने भीती बाधीतांच्या मदतीला शिवसैनिक; यंत्रणाही सतर्क

**धुळे, दि.१९- शिंदखेडा तालुक्यातील नवी-आच्छी या गावात चिकुनगुनिया या आजाराचा उद्रेक झाला आहे. गावातील जवळपास शंभरावर नागरिक चिकुनगुनियाने बाधीत झाले आहेत. धमाणे येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी गावात नागरिकांवर उपचार करीत आहेत. गावातील सांडपाण्याचा निचरा आणि पिण्याचे पाणी सुरक्षित करण्याबरोबरच अन्य उपाययोजना केल्या जात आहेत. गावकऱ्यांच्या मदतीसाठी शिवसेना उध्दव**



**बाळासाहेब ठाकरे पक्षाचे स्थानिक पदाधिकारी आणि कार्यकर्ते मदत करीत आहेत. ग्रामस्थांनी उपचार घ्यावेत आणि पथ्य पाळावीत, असे आवाहन शिवसेनेचे ग्रामीण क्षेत्र जिल्हा प्रमुख शाहणा सोनवणे यांनी केले आहे.**

शिंदखेडा तालुक्यातील नवी आच्छी या गावात चिकुनगुनियाची लागण झाल्याने आजूबाजूच्या गावांमध्ये भितीदायक वातावरण निर्माण झाले आहे. चिकुनगुनीयाची लागण झाल्यास हात-पाय, कंबर दुखी आणि सांधेदुखीचा त्रास होतो. गावातील **(पान ४ वर)**

## धुळ्यात आज लोकशाही दिन

धुळे, दि.१९- जिल्ह्यातील समस्याग्रस्त व पिडीत महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ मिळावे, तसेच त्यांच्या हक्काचे संरक्षण होवून त्यांना न्याय मिळावा. यासाठी एक प्रभावी उपाययोजना म्हणून प्रत्येक महिन्यात जिल्हास्तरावर महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. माहे एप्रिल २०२६ महिन्याचा महिला लोकशाही दिन सोमवार २० रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे येथे आयोजित करण्यात आला आहे. अशी माहिती राजेंद्र भामरे, सदस्य सचिव, महिला लोकशाही दिन तथा जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, धुळे यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे.महिला **(पान ४ वर)**




(छाया : वैभव मदाने)

## श्रीक्षेत्र जाळीचा देव येथे पाच कोटीचा निधी मंजूर : महंत कारंजेकर बाबा

**नाशिक, दि.१९ (प्रतिनिधी)- शासनाच्या तीर्थक्षेत्र विकास योजनेतून राज्यातील महानुभाव तीर्थस्थानाची अनेक कामे पूर्ण झाले असून काही प्रगतीपथावर आहेत तसेच त्या स्थानांना जोडण्यासाठी सर्वज्ञ अष्टशताब्दी महामार्गाचे काम सुरू आहे. श्री क्षेत्र रिद्धपूर येथे जगातले पहिले मराठी विद्यापीठ स्थापन झाले असून त्या ठिकाणी अध्ययन सुरू झाले आहे. श्रीक्षेत्र जाळीचादेव येथेही भक्त निवास व सभामंडपासाठी पाच कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून चोवीस कोटी रुपयांची कामे प्रस्तावित आहेत त्यालाही लवकरच मान्यता मिळणार असल्याची माहिती अखिल भारतीय महानुभाव परिषदेचे अध्यक्ष महंत कारंजेकर बाबा यांनी दिली.**

श्रीक्षेत्र जाळीचा देव येथे अखिल विश्व भोपे पुजारी समाज सत्कार समारंभ तथा पदग्रहण सोहळ्यात महंत कारंजेकर बाबा बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महंत लासुरकर बाबा (पिंप्राळा) उपस्थित होते. महंत महंत मेहकरकर बाबा यांच्या हस्ते सभा मंडपाचे उद्घाटन, तर अखिल भारतीय पंचकृष्ण प्रबोधन परिषदेचे अध्यक्ष महंत लोणारकर बाबा रिद्धपूरकर बाबा यांच्या हस्ते यावेळी दीप प्रज्वलन करण्यात आले. महंत चिचोंडीकर बाबा यांनी यावेळी भोपे पुजारी समाजाची प्राचीन माहिती देऊन या समाजाचा **(पान ४ वर)**

## अक्षयतृतीयाचे घरोघरी पुजन; बाजारात सोने-चांदीची मोठी खरेदी

**धुळे, दि.१९- अक्षयतृतीयेची घरी विधीवत पुजा करताना अनेकांनी या पवित्र मुहूर्तावर सोने, चांदीची खरेदी केली. या दिवशी श्नयतोवर गुंतवणूक म्हणून सोने-चांदीची खरेदी होते. अपवादात्मक नागरिक दागिन्यांची खरेदी करतात. कारण, दागिने खरेदीतून हौस होते शिवाय गुंतवणूक देखील होते, अशी धारणा आहे. धुळे शहराच्या सराफ बाजारात अक्षयतृतीयेच्या मुहूर्तावर सोने एक लाख ५४ हजार रूपये प्रति दहा ग्रॅम आणि चांदी दोन लाख साठ हजार रूपये प्रति किलो या दराने खरेदी-विक्री झाली. दिवसभरात सराफ**



**बाजारात कोट्यावधी रूपयांची उलाढाल झाली.**

हिंदू-धर्म संस्कृतीत अनेक सण साजरे केले जातात. तसेच काही महूर्त पवित्र मानले जातात. शास्त्रानुसार एकूण साडेतीन पवित्र मुहूर्त आहेत. त्यातील एक मुहूर्त अक्षयतृतीयेचा मानला जातो. अक्षयतृतीयेच्या दिवशी आपण जे काही खरेदी करतो, त्याचा कधीच क्षय होत नाही, अशी धारणा आहे. त्यामुळे या दिवशी अनेक जण सोने, चांदीसह अन्य धातूंची खरेदी करतात. काही जण शेती, प्लॉट, इमारत खरेदी करतात. अक्षयतृतीयेच्या दिवशी विधीवत पुजन केले जाते. त्यात देवीदेवतांबरोबर पुर्वजांचे देखील पुजन केले जाते. एकाचवेळी देवीदेवता आणि पुर्वजांचे आशीर्वाद लाभले तर खूप उन्नती होते, अशी धारणा आहे. त्यामुळे घरोधरी धान्याच्या राशीवर मातीची धागर ठेऊन त्यावर खरबूज, खरबूजावर पुरणपोळी, आमरस आणि पंचपक्वान्न ठेवले जाते. अग्नीकुंडात पंचपक्वान्न टाकून त्याचा गंध पुर्वजांपर्यंत पोहचविला जातो. घरातील महिला विधीवत पुजनाची तयारी करत असताना पुरूष आणि जाणकार महिला सराफ बाजारात सोने, चांदीची खरेदी करतात. अक्षयतृतीयेचा मुहूर्त साधत अनेकांनी धुळे शहराच्या सराफ बाजारात दागिन्यांची तर गुंतवणूक म्हणून **(पान ४ वर)**




## धुळ्यात दामा पुरस्कारांचे वितरण डॉक्टरांच्या कार्याचा झाला गौरव

**धुळे, दि.१९- डॉ. आंबेडकर मेडिकोज असोसिएशन, श्री भाऊसाहेब हिरे वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय तसेच इंडियन मेडिकल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर व महात्मा ज्योतिबा फुले जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या डॉक्टरांचा गौरव करण्यात आला. दरवर्षीप्रमाणे यंदाही विविध पुरस्कारांचे वितरण उत्साहात पार पडले.**

सन २०२५-२६ या वर्षासाठी दामा पुरस्कार डॉ.गौतम शिलावंत यांना प्रदान करण्यात आला. दामा मित्र पुरस्कार पत्रकार निखिल सूर्यवंशी यांना, तर दामा स्त्री गौरव पुरस्कार डॉ.सुरेखा बोर्डे यांना देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी श्री भाऊसाहेब हिरे वैद्यकीय महाविद्यालयातून शिक्षण घेऊन देशातील विविध मोठ्या रुग्णालयांमध्ये कार्यरत असलेल्या माजी विद्यार्थ्यांचाही विशेष सत्कार करण्यात आला. यामध्ये डॉ. सयाजी भामरे (डीन, हिरे मेडिकल कॉलेज, धुळे), डॉ. नितीन कुलकर्णी (डीन, जवाहर फाउंडेशन), डॉ.रवींद्र सोनवणे (जिल्हा शल्य चिकित्सक, धुळे) तसेच डॉ.अनंत पवार (डीन, जीएमसी कॉलेज, खंडवा) यांचा समावेश होता.

कार्यक्रमास आय.एम.ए.चे माजी राष्ट्रीय **(पान ४ वर)**

## शिक्षण विभागाकडून शहाद्यातील इंग्लिश स्कूलच्या चौकशीचे आदेश

**शहादा, दि.१९ (का.प्र.)- शहरातील एका इंग्लिश स्कूल विरुद्ध अखिल भारतीय ग्राहक पंचायत यांनी केलेल्या गंभीर तक्रारींची दखल घेत, शिक्षण विभागाने या प्रकरणाच्या सखोल चौकशीचे आदेश दिले आहेत. शाळेकडून विद्यार्थ्यांचा मानसिक छळ आणि आर्थिक लूट होत असल्याचा प्राथमिक आरोप तक्रार अर्जात करण्यात आला असून, यामुळे शैक्षणिक वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. दरम्यान, अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे शहादा तालुका अध्यक्ष अनिल भामरे यांनी पालकमंत्री हसन मुश्रीफ यांना लेखी निवेदन देऊन चौकशी करण्याची मागणी केली आहे.**

अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे शहादा तालुका अध्यक्ष अनिल भामरे यांनी पालकमंत्री व जिल्हा प्रशासनाकडे पुराव्यांसह सादर केलेल्या निवेदनाचा आशय असा की, विद्यार्थ्यांना शालेय



वस्तू आणि गणवेश शाळेतूनच किंवा विशिष्ट दुकानातूनच खरेदी करण्याची सक्ती केली जाते. शालेय साहित्याची विक्री करताना व्यवहार केवळ रोख स्वरूपात केले जातात, जेणेकरून पालकांकडे तक्रारीसाठी **(पान ४ वर)**

## अभियंत्याची आत्महत्या तीन जणांवर गुन्हा दाखल

धुळे, दि.१९- देवपूर परिसरातील महाराणा प्रताप कॉलनी परिसरात शाम पाटील नामक अभियंत्याने दि.१२ एप्रिल रोजी आत्महत्या केली होती. या प्रकरणी सासरच्या तिघांविरोधात देवपूर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिलेने दिलेल्या फिर्यादीनुसार, अभियंता शाम पाटील यांनी आत्महत्या केल्यानंतर त्यांच्याजवळ सुसाईड नोट आढळून आली. आपल्या मुलाने सासरच्या लोकांच्या जाचाला कंटाळूनच आत्महत्या केल्याचे सांगत सासरे शशिकांत लोखणे, सासु रेखा लोखणे व शालक भावेश लोखणे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियानात नंदुरबार जिल्ह्याची निवड

**नंदुरबार, दि.१९ (प्रतिनिधी)- राज्य शासनाच्या राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा सन २०२५-२६ अंतर्गत उत्कृष्ट कामगिरीबद्दल नंदुरबारच्या जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी तसेच तळोदा येथील आदिवासी विकास विभागाचे प्रकल्प अधिकारी तथा सहाय्यक जिल्हाधिकारी अनय नावंदर यांची राज्यस्तरावर पारितोषिकासाठी निवड करण्यात आली असून, त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात येणार आहे.**

महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागामार्फत राबविण्यात आलेल्या या स्पर्धेत प्रशासनातील गतीमानता, सेवा वितरणाची कार्यक्षमता, पारदर्शकता, नवोपक्रमांचा वापर आणि नागरिकाभिमुख दृष्टिकोन या निकषांच्या आधारे राज्यभरातील जिल्हे व अधिकारी यांचे मूल्यमापन करण्यात आले. नंदुरबार जिल्ह्याने दुर्गम व आदिवासी भागात सेवा पोहोचविणे, योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि प्रशासनातील समन्वय यात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. तळोदा तालुक्यातही स्थानिक पातळीवरील **(पान ४ वर)**

## बोगस डॉक्टर विरोधात गुन्हा

धुळे, दि.१९- तालुक्यातील तिसगाव ढंढाणे गावातील बोगस डॉक्टर निलेश नानाभाऊ मोरे याच्या विरोधात प.देवपूर पोलीस स्टेशनला गुन्हा नोंदविण्यात आला आहे. जि.प.वैद्यकीय अधिकारी दिनेश रामदास सोनवणे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, तिसगाव ढंढाणे गावात निलेश नानाभाऊ मोरे याच्याकडे ॲलोपॅथिक वैद्यकीय व्यवसाय करीत असल्याच्या संशयावरून दि.१७ एप्रिल रोजी सकाळी छापा मारला. यावेळी वैद्यकीय व्यवसायाशी संबंधित अधिकृत कागदपत्रांची मागणी करण्यात आली त्यावेळी मोरे हे नोंदणीकृत कुठल्याही संस्थेकडून वैध प्रमाणपत्र न घेता ॲलोपॅथीचा वैद्यकीय व्यवसाय करत असल्याचे उघड झाले.

**दिपक ज्वेलर्स**
सोने- 22 K -1,40,800 रु.+3% GST
सोने- 24 K -1,53,700 रु.+3% GST
चांदी- 2,62,500 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

## महाराजस्व अभियानांतर्गत विरदेल महसुल मंडळातील ग्रामस्थांना एकाच ठिकाणी सोळा योजनांचा लाभ

**धुळे, दि.१९- शिंदखेडा तालुक्यातील विरदेल महसुल मंडळात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान राबविण्यात आले. यात एकाच ठिकाणी नागरिकांना निरनिराळ्या सोळा योजनांची माहिती देण्यात आली. विरदेल येथील ग्राम महसूल अधिकारी तुषार पवार यांनी शिबीराचे नियोजन केले होते. या उपक्रमासाठी पालकमंत्री जयकुमार रावल, जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते, प्रांताधिकारी शरद मंडलीक, तहसीलदार नितीनकुमार देवरे, गटविकास अधिकारी रमेश नेतनवार,**



**तालुका कृषी अधिकारी मनोज सिसोदे यांनी शासकीय यंत्रणेला मार्गदर्शन आणि सहकार्य केले.**

विरदेल येथे झालेल्या शिबीराच्या सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन आणि दिपप्रज्वलन मान्यवरांनी केले. हयावेळी माजी सभापती जिजाबराव सोनवणे, माजी सरपंच सुवर्णा सतिष बेहेरे, आर. आर. पाटील, साहेबराव पेंढारकर, प्रमोद पवार, नायब तहसीलदार शारदा बागले, विजय गोस्मावी, सतीश बेहरे, जे. एस. पाटील, एस. एस. गोसावी, एम.पी. पाटील, **(पान ४ वर)**

## नंदुरबारमध्ये यंदाही अनोखी परंपरा

नंदुरबार, दि.१९ (प्रतिनिधी)- पारंपरिक पद्धतीनुसार ज्या युवकाने सर्वात जड दगड उचलला, त्याची सालदार म्हणून निवड केली जाते आणि त्याला सर्वाधिक मजुरी दिली जाते. जे युवक दगड उचलण्यात अपयशी ठरतात, त्यांनाही काम दिले जाते; मात्र त्यांच्या क्षमतेनुसार मजुरी निश्चित केली जाते.पूर्वी शेतीसाठी मजबूत आणि मेहनती सालदार निवडण्यासाठी ही पद्धत मोठ्या प्रमाणात प्रचलित होती. खान्देशात अक्षय तृतीयेच्या दिवशी सालदार निवडण्याची परंपरा आजही विविध ठिकाणी पाळली जाते. माळीवाडा परिसरात दगड उचलण्याची ही परंपरा वर्षानुवर्षे जपली गेली आहे. सध्या आधुनिकतेच्या प्रभावामुळे ही परंपरा काही **(पान ४ वर)**

## अनुसूचित जातीतील आरक्षणाच्या उपवर्गीकरणाला बसपाचा विरोध

**नंदुरबार, दि.१९ (प्रतिनिधी)- बहुजन समाज पार्टी च्या नंदुरबार जिल्हा युनिटकडून अनुसूचित जातीतील आरक्षणाच्या प्रस्तावित उपवर्गीकरणाला तीव्र विरोध नोंदविण्यात आला आहे.**

अनंत बदर समितीची स्थापना असंवैधानिक असल्याचा आरोप करत, समितीने संबंधित जातींचे प्रतिनिधित्व न घेता तसेच अहवाल जाहीर न करता काम केल्याची टीका करण्यात आली. शासनाने अत्यल्प मुदतीत आक्षेप मागवून तत्काळ सुनावणी जाहीर केल्यामुळे संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक नसल्याचे मत व्यक्त करण्यात आले. समितीचा अहवाल तात्काळ जाहीर करावा, आक्षेप नोंदवण्यासाठी किमान १ महिन्याची मुदत द्यावी आणि सर्व घटकांना विश्वासात घेऊन निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली. अन्यथा न्यायालयीन लढा देण्याचा इशाराही देण्यात आला. हे निवेदन जिल्ह्याचे पालकमंत्री हसन मुश्रीफ यांना देण्यात आले. यावेळी बसपाचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब ब्राम्हणे, जिल्हा प्रभारी जितेंद्र तायडे, महिला जिल्हाध्यक्ष प्रमिला जाधव, विश्वास पवार, राजेंद्र महाले, ललित पानपाटील, रतका पवार आदी उपस्थित होते.

**जांभुळ ज्युस मिळेल**




नैसर्गिक पद्धतीने पिकवलेल्या जांभळा पासून तयार केलेला रस (ज्युस) उपलब्ध आहे. कोणताही रंग, संरक्षक (प्रिझर्व्हेटीव्ह), पाणी न टाकता बनवलेला जांभळाचा शुद्ध रस (ज्युस) 200.MLच्या काचेच्या बाटलीत उपलब्ध आहे.
**संकेत नित्या फार्म**
जनशक्ती बिल्डींग दै.आपला महाराष्ट्र कार्यालय
वीर सावरकर मार्ग- धुळे. ०२५६२-२३५३९६, २३८३९६

# हस्ती ग्रुप ऑफ प्री प्रायमरी विभागाचा सिनियर केजी विद्यार्थ्यांचा पदवीदान समारंभ उत्साहात संपन्न



दोंडाईचा, दि.१९- हस्ती चॅरिटेबल ट्रस्ट संचलित हस्ती प्री प्रायमरी स्कूल कारागी ज्ञानदीप, हस्ती विद्यारंभ सेमी इंग्रजी बालवाडी तसेच हस्ती प्री प्रायमरी विद्या कॉलनी यांच्या सिनियर के जी विद्यार्थ्यांचा पदवीदान समारंभ हस्ती ग्रुप ऑफ स्कूलचे चेअरमन कैलास जैन यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहवर्धक व भावनिक वातावरणात आयोजित करण्यात आला.

यावेळी प्रमुख अतिथी डॉ.बी.बी. पाटील, डॉ.पारुल अग्रवाल, नगरसेवक प्रवीण महाजन सहाय्यक समितीच्या डायरेक्टर सुष्माजी जैन, सुनीताजी जैन, शितलजी जैन, हस्ती गुरुकुलचे मुख्याध्यापक सदाशिव महाजन तसेच हस्ती ग्रुप ऑफ प्री प्रायमरीच्या मुख्याध्यापिका पूनम पाटील, स्मिता साठे, माधुरी पाटील, प्रशासकीय अधिकारी रेखा गाडेकर, सोबतच समन्वयक मनोज ठाकूर, महेश डीगराळे, समन्वयिका समिना बोहरी उपस्थित होते. या कार्यक्रमात एकूण १४१ विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. कार्यक्रमात दरम्यान कृत्रिम बुद्धिमत्तेच्या तंत्रज्ञानावर आधारित विद्यार्थ्यांची भविष्यातील व्यावसायिकता संगणकाच्या माध्यमातून एल ई डी स्क्रीनवर प्रत्यक्षिक सादर करण्यात आले. पंचकोशावर आधारित शाळेतील विविध शैक्षणिक व सहशालेय उपक्रमही जे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासास चालना देणारे ठरलेले माहितीपटही दाखविण्यात आले.

कार्यक्रमात दरम्यान वर्गशिक्षिका व बालक यांच्यातील भावबंध दर्शवणारी चित्रफीतही दाखविण्यात आली. यामुळे उपस्थित पालकांचे व शिक्षकांचे डोळे पाणावले तसेच काहीसे भावनिक वातावरण ही निर्माण झाले. मध्यंतरी बालकांनी आपले मनोगत व्यक्त केले. सोबतच पालकांनीही आपल्या मनोगतातून शाळेच्या संस्काररूपी उपक्रमांचे कौतुक केले. समन्वयीका समीना बोहरी यांनी हस्ती वर्ल्ड स्कूल विषयी माहिती सादर केली. मुख्याध्यापिका यांनीही बालकांशी संबंधित भावनिकतेवर आधारित मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता मुख्याध्यापिका पूनम पाटील, स्मिता साठे, माधुरी पाटील व शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन मंजुषा मोरे, कशिश माखिजा, विशाखा पाटील यांनी केले. प्रसंगी धनंजय भदाने यांनी सहकार्य केले. तसेच समन्वयक महेश डीगराळे व मनीषा खैरनार यांनी तांत्रिक सहाय्य केले.



# नंदनगरीतील ऐतिहासिक प्राचीन दत्त मंदिराचे उद्योगपती मनोज रघुवंशी यांच्या हस्ते भूमिपूजन

**नंदुरबार, दि.१९ (प्रतिनिधी) - शहरातील ऐतिहासिक व सुमारे १३० वर्षे जुने प्रभू श्री दत्त मंदिराचा जीर्णोद्धाराचा भूमिपूजन रविवारी अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर उद्योगपती मनोज रघुवंशी व इंदिरा महिला सहकारी बँकेच्या चेअरमन कविता रघुवंशी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी गुरुदत्त भगवान की जय असा जयघोष करण्यात आला.**

नंदुरबार शहरातील हाटदरवाजा परिसरात असलेले हे प्राचीन दत्त मंदिर १८९७ साली स्थापन करण्यात आले होते. त्या काळात महादू झुगाजी शिंदे, गणपत कृष्णाजी शिंदे व मानाजी कृष्णाजी शिंदे यांनी मंदिरासाठी जमीन दान दिली होती. सुमारे १३० वर्षानंतर आता या मंदिराचा जीर्णोद्धार उद्योगपती मनोज रघुवंशी यांच्या आर्थिक सहकार्याने करण्यात येत आहे. रविवारी सकाळी भूमिपूजनापूर्वी धार्मिक विधी पार पडले. यावेळी शिवसेनेचे संपर्कप्रमुख आ.चंद्रकांत रघुवंशी, जिल्हाप्रमुख ड. राम रघुवंशी, नगरसेवक यशवर्धन रघुवंशी तसेच दत्त मंदिर संस्थानचे पदाधिकारी व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पौरोहित्य पंकज त्रिवेदी व जगदीश त्रिवेदी यांनी केले.

**७ महिन्यात काम पूर्णत्वास**

भूमिपूजनानंतर बांधकामाला सुरुवात करण्यात येणार असून, येत्या डिसेंबर महिन्यात दत्त जयंतीपूर्वी काम पूर्ण करण्याचा संस्थेचा प्रयत्न आहे. मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी देणगी संकलन सुरू करण्यात आले होते. अनेक दानशूर व्यक्तींनी सहकार्य केले. त्याचवेळी उद्योगपती मनोज रघुवंशी यांनी सढळ हस्ते मदत करत जीर्णोद्धाराची संकल्पना पुढे आणली.

# पशु पालकांना उद्योजक बनविणाऱ्या योजना राबवा पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय राज्य सचिवांचे निर्देश



**धुळे, दि.१९- राज्याचे पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विभागाचे सचिव एम.रामास्वामी यांचा धुळे जिल्हा दौरा आज यशस्वीरीत्या पार पडला. या दौऱ्यादरम्यान महाराष्ट्र ग्रामीण पशु उद्योजक कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या २७ योजनांच्या माध्यमातून जिल्ह्यातील पशुपालकांना उद्योजक बनविण्याचे उद्दिष्ट सचिवांनी स्पष्ट केले. सदर योजनांचा व्यापक स्तरावर प्रचार-प्रसार करून जास्तीत जास्त लाभार्थ्यांना लाभ मिळावा, यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने कार्य करावे, असे निर्देश त्यांनी दिले. तसेच शेळीपालन, कुक्कुटपालन व चारा उत्पादन यांसारख्या उपक्रमांद्वारे पशुपालकांनी स्वावलंबी व्हावे, असे मार्गदर्शनही त्यांनी केले.**

जिल्ह्यातील तांत्रिक कामकाज अधिक प्रभावी व गुणवत्तापूर्ण करण्यासाठी आवश्यक त्या सुधारणा करण्याबाबत सचिवांनी संबंधित अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. एकात्मिक पाहणी योजनेअंतर्गत धुळे जिल्ह्याने मागील चार वर्षांत राज्यात उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल त्यांच्या हस्ते जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. गिरीश पाटील तसेच जिल्हाप्रमुख रमण गावित (सहाय्यक पशुधन विकास अधिकारी) यांचा विशेष प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. तसेच एकात्मिक पाहणी योजनेत क्षेत्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये डॉ.तुषार पाटील (शिरपूर), डॉ.वर्षा ठाकरे (साक्री), मधुकर चौधरी (धुळे), विक्रम बैसाणे (शिंदखेडा) व मुकेश माळी (धुळे) यांचा सचिव महोदयांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

राष्ट्रीय पशुधन प्रणालीअंतर्गत धुळे जिल्ह्याने राज्यात अग्रक्रम मिळविल्याबद्दल उत्कृष्ट कार्य करणारे अधिकारी व कर्मचारी डॉ. चंद्रकांत आव्हाड (साक्री) व रमण गावित यांचा शासनाचे प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमात डॉ. शितलकुमार मुकणे (अतिरिक्त आयुक्त, पशुसंवर्धन) तसेच बी.आर. नरवाडे (प्रादेशिक सहआयुक्त, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय) यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी सहाय्यक आयुक्त डॉ.मिलिंद भणगे, डॉ.नितीन सोनवणे, डॉ.मनोज पाटील, डॉ.बडे (सहाय्यक आयुक्त), डॉ. प्रशांत निकम (पशुधन विकास अधिकारी), डॉ.गाडे तसेच संघटनेचे पदाधिकारी डॉ.संजय पाटील, डॉ.हसराज देवरे, डॉ. सोहमलाल राठोड, डॉ.नरहर पाटील आदी उपस्थित होते.



# महात्मा बसवेश्वर जयंती उत्साहात धुळ्यात निघाली मोटारसायकल रॅली

**धुळे, दि.१९- श्री महात्मा बसवेश्वर जयंती उत्सवानिमित्त धुळे जिल्हा वीरशैव लिंगायत समाजाच्या वतीने अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी श्री महात्मा बसवेश्वर चौकात प्रतिमा पूजन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली चौकातून भव्य मोटरसायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते यात समाजातील महिलांनीही सहभाग घेतला होता.**

स्मारक समितीचे अध्यक्ष शशीभाऊ मोगलाईकर यांच्या हस्ते आमदार अग्रवाल यांचा सत्कार करण्यात आला. राकेश लगडे यांच्या हस्ते माजी महापौर चंद्रकांत सोनार यांचा सत्कार करण्यात आला. प्रस्तावना कपिल लिंगायत यांनी केली. एडवोकेट श्री गजानन मेहकरकर यांनी महात्मा बसवेश्वर यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला, कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता लक्ष्मण चांदणे, अशोक गुळवे, राम करणे, सचिन कणै, राजू गादगे, राजेश लिंगायत, नितीन गुळवे, नितीन लिंगायत, किशोर लिंगायत, दीपक लोहारकर चिळू आवळकंठे वाल्मीक लिंगायत संतोष लगडे इत्यादींनी परिश्रम घेतले. यानिमित्त काढण्यात आलेल्या रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असे जिल्हाध्यक्ष राकेश गादगे यांनी कळविले आहे.

# होमिओपॅथिक डॉक्टर्स असो.जिल्हाध्यक्षपदी डॉ.पाठक

धुळे, दि.१९- साक्री रोडवरील सुमन हॉस्पिटलमध्ये घेण्यात आलेल्या बैठकीत होमिओपॅथिक डॉक्टर्स असोसिएशनच्या धुळे जिल्हाध्यक्षपदी डॉ.सुधीर पाठक यांची एकमताने निवड करण्यात आली.माजी जिल्हाध्यक्ष डॉ. किशोर कासोदेकर यांच्या हस्ते डॉ.सुधीर पाठक यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. हिरामण मोरे, डॉ.रमेश जैन, डॉ.वाल्मिक पाटील, डॉ.मनोज परदेशी, डॉ.राजेश कासार, डॉ. सागर महाजन, डॉ.अरविंद पाटील, डॉ.संतोष चौधरी, डॉ. किशोर देशपांडे, डॉ. पराग पवार, डॉ.दीपक जैन, डॉ. परदेशी, डॉ.बेहरे, डॉ.विशाल भट, डॉ. विराज जैन उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

**तमाम जनतेस, सर्व हित संबंधितांना तसेच सर्व वित्तीय संस्था व स्थानिक स्वराज्य संस्था यांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकतीचे मालक श्री. चंद्रकांत तुकाराम सूयवंशी रा. फ्लॅट क्रमांक ५, प्लॉट क्र. ४२, एकदंत हौसिंग सोसायटी वैभव नगर, धुळे .यांच्याशी आमचे अशिल यांनी खालील नमूद मिळकत कायमस्वरुपी विकत घेण्याचा सौदा करार केलेला असून यासौदे करारापोटी बयाणा रक्कम देखील स्विकारलेली असून लवकरच शदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण होणार आहे, सदर मिळकतीच्या टायटल व्हेरिफिकेशन हेतू सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहे.**

**तरी सदर मिळकतीत कोणाचेही कोणतेही प्रकारचे मालकी हक्क, हिस्सा, हितसंबंध, गहाण, बोजा, टांच, जप्ती भाडेपट्टा वा लिज हक्क, ताबा हक्क वा सौदेकरार हक्क अगर खरेदी हक्क वगैरे काहीही असल्यास किंवा संकल्पीत व्यवहारास कोणत्याही प्रकारे हरकत वा विरोध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आंत त्याबद्दल स्वत:च्या हक्काच्या प्रमाणीत झेरॉक्स प्रतिसह आम्हास खालील नमूद पत्त्यावर लेखी कळवावे. परस्पर वर्तमानपत्रात घेतलेल्या हरकतीचा तसेच दस्तऐवजांशिवाय घेतलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.**

**नियोजित मुदतीत कोणाचीही साधार व लेखी तक्रार न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निर्बोज असून तथाकथीत हक्क व अधीकार संबंधीतांनी सोडून दिलेले आहे. असे समजून सदर व्यवहार पूर्ण करण्यात येईल. या नंतर कोणीही काहीही तक्रार, हितसंबंध अगर हक्क दाखविल्यास ते आमचे आशिल आणि सदर मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी, कळावे.**

**परिशिष्ट :-** मौजे धुळे ता. जि. धुळे म. न. पा. हद्दीतील स. क्र. ५३५/१/५३५/२अ/५३५/२ब पैकी प्लॉट क्रमांक ५९ चे एकूण क्षेत्रफळ १५४.०० चौ.मी. आणि यासी सिटी सर्व्हे क्रमांक ४३९०/ब/क/ड पैकी प्लॉट क्रमांक १०३ चे एकूण क्षेत्र १५४.०० चौ.मी. बखळ प्लॉट मिळकत, यांसी चतु:सिमा व मापे येणे प्रमाणे असे.

| | चतु:सिमा | मापे |
|---|---|---|
| पुर्वेस : | सिटीएस क्र. ४३९०/ब/क/ड/११४ | ११.०० मी. |
| पश्चिमेस: | १२ मी. रोड | ११.०० मी. |
| दणिस : | ९ मी. रोड | १४.०० मी. |
| उत्तरेस : | सिटीएस क्र. ४३९०/ब/क/ड/१०४ | १४.०० मी. |

सदर जाहीर नोटीस अशिलाने दिलेल्या माहिती व अधिकारावरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. दि. १९/०४/२०२६

**अॅड.शैलेश मदनलाल पंसारीया**
ऑफिस :५ दिघे अॅडव्होकेटस चेंबर्स, धुळे जिल्हा कोर्टासमोर
स्टेशन रोड,धुळे.मो.नं.९७६६२५५७७९,९१७२१८१७७७

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, सर्व बँका, सर्व वित्तीय पतसंस्था यांसी जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मिळकत वर्णन तु. जि. धुळे पो.तु. ता. धुळे जि. प. व ता. पं. स. धुळे मौजे नगांव ब्रु येथील धुळे म. न. पा. हद्दीतील स. नं. २९७/१ पैकी प्लॉट नं. ५९ चें एकूण क्षेत्र ७५ चौ. मी.सुमारे ८०७ चौ.फुट९९९ बखळ प्लॉट यांसी चतु:सिमा व मापे पूर्वेस : ५ मी. प्लॉट नं. ५६, पश्चिमेस : ५ मी, वापर व रस्ता, दक्षिणेस १५ मी. प्लॉट नं. ६०, उत्तरेस : १५ मी. प्लॉट नं. ५८, येणे प्रमाणे वर्णनांचे चतु:सिमे आंतील उपरोक्त बखळ प्लॉट मिळकत मालक ज. मु. ज्ञानेश्वर भिवसन माळी रा. ग. नं. ८ पंचवटी देवपूर, धुळे ता. जि. धुळे यांनी उपरोक्त बखळ प्लॉट मिळकत अंगभुत व तदंगभूत वस्तुसह कायमस्वरुपी विक्री देणेबाबत आमचे अशिल सौ. सुनंदा बाजीराव पदमार यांचेशी सौदा करार केला असून उपरोक्त मिळकत निर्बोज व निर्वेध आहे असे सांगितले आहे. उपरोक्त मिळकतीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध गहाण, तारण, वहिवाट, कुळ, जामीन, जप्ती, टांच, वारस, बक्षीस, बोजा, सौदा, इ. बाबत हरकत असल्यास प्रस्तुतची जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आंत खालील दिलेल्या पत्त्यावर प्रत्यक्ष हरकतीसोबत योग्य तो कागदोपत्री पुरावा सादर करुन शहानिशा करून द्यावी. टपाल व फोनवर परस्पर हरकत मान्य होणार नाही. मुदतीत हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील मिळकतीबाबत मुदतीनंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही. ते आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. कळावे.

प्रस्तुतची जाहीर नोटीस अशिलांनी दिलेल्या माहिती व सांगणेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे

दिनांक १९/०४/२०२६

**अॅड.किशोरकुमार एस. शर्मा**
४४ ब, गुरुकुंज जयशंकर कॉलनी,
चाळीसगांव रोड, धुळे
मो. नं. ९९६०२९३६७०

# संघ राज्यातील महाराष्ट्राचे स्थान नगण्य

(पान २ वरुन) त्यात जनगणनेत अधोरेखित झालेल्या जाती जमातींचे प्रतिनिधित्व देखील येणार होते. पण सरकारला आपण पुन्हा सत्तेत येऊ याची खात्री नसल्यामुळे घाई गर्दीत सरकारने परिसीमन बिल संसदेत आणले. गाय पट्ट्याच्या भरोशावर आपली सत्ता कायमसाठी अबाधित राहील आणि दक्षिण विरुद्ध उत्तर असे विभाजन होईल या इराद्याने आणलेले हे विधेयक होते हे स्पष्ट आहे. परंतु सरकारने ते नामंजूर झाल्यामुळे महिलांचा कळवळा दाखवत विरोधी पक्षांवर खापर फोडले आणि हे पक्ष महिला विरोधी असल्याचे खुद्द सरकारच्या प्रमुखांनी राष्ट्राला उद्देशून सांगितले.

जरी सर्व राज्यांच्या जागा ५० टक्क्यांनी वाढणार असल्या तरी उत्तरेतील राज्यांच्या जागांची संख्या खूप मोठी राहणार आहे. त्याद्वारे आपला अजेंडा शासक पक्षाला पुढे रेटता येईल अशीच ही खेळी होती. विरोधकांच्या एकजुटीने ती हाणून पाडली. आता गल्लीबोळातील कार्यकर्ते आणि महिला कदाचित पुन्हा रस्त्यावर येत विरोधी पक्ष नेत्यांच्या प्रतिमांना जोडे मारतील. त्यांच्यासाठी निष्ठा व्यक्त करणारा हा एकमेव मार्ग आहे.

अगदी नगरसेवक देखील यापुढे आहेत. ते आता स्थानिक विकासाच्या ऐवजी या कामासाठीच निवडून आले किंवा आणले अशीच परिस्थिती निर्माण झालेली आहे. मात्र विवेकवादी लोकांची संख्या काही कमी नाही. त्यांना शासक पक्षाचा कावा लक्षात आलेला आहे. पाचशे त्रेचाळीस सदस्य संख्येत महिलांना तेहतीस टक्के आरक्षण देण्यास सर्व विरोधी पक्ष तयार आहेत. मात्र त्याबाबत न बोलता शासक पक्ष दिशाभूल करण्याचे काम करीत असल्याचे उघड आहे. सजग जनतेने हा डाव लक्षात घेणे आवश्यक आहे.

## CHANGE NAME

My Old Name Was
***REHANA BI SATTAR KHA***
My Correct & New Name is
***REHANA BI SAIYYAD AMJAD***
As Per Documents
Residing at -House No.33,
Chalisgaon Road
Jamka Malla Dhule-424001

## रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान

---

## जाहीर नोटीस

अर्जदार वकील
**अॅड. व्ही. एस. पाटील**

**शिंदखेडा येथील मे.दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर सो. .यांचे कोर्टात**

दिवाणी कि. अर्ज नं. ११८/२०२६
नि. ०६

**१) सुमनबाई दुर्योधन राजपूत, २) राजेंद्रसिंग दुर्योधन जाधव,
३) जितेंद्र दुर्योधन जाधव, ४) नितेन्द्रसिंग दुर्योधन जाधव.
सर्व रा. मु. पो. आदर्श कॉलोनी३, शिंदखेडा ता. शिंदखेडा जि. धुळे. . ..अर्जदार**

॥विरूध्द॥

**कोणीही नाही** .... जाबदेणार
कै. दुर्योधन पौलदसिंग राजपूत, मृत्यू दि. ११/०२/२०२६. .... अर्जदार

ज्याअर्थी अर्जदार यांनी नामे कै. दुर्योधन पौलदसिंग राजपूत हे दि. ११/०२/२०२६ रोजी मौजे शिंदखेडा ता. शिंदखेडा येथे मयत झाल्यावर यांना कै. दुर्योधन पौलदसिंग राजपूत मयत झाल्यावर यांना अर्जदार नं. १ सुमनबाई दुर्योधन राजपूत ह्या पत्नी या नात्याने तसेच अर्जदारनं. २ राजेंद्रसिंग दुर्योधन राजपूत, अर्जदार नं.३जितेंद्र दुर्योधन राजपूत व अर्जदार नं. ४नितेंद्रसिंग दुर्योधन राजपूत, हे मुले या नात्याने कायदेशीर वारस आहेत या शिवाय त्यांना अन्य वारस नाहीत. या शिवाय त्यांना अन्य वारस नाहीत. त्याअर्थी सदरहू मयतास अजून कोणी वारस आहेत किंवा काय? किंवा अर्जदारांनी अर्जात नमूद केलेल्या व्यक्ती मयताचे वारस नाहीत असे कोणाचे काहीही म्हणणे हरकत/तक्रार असल्यास त्यांनी दि. ०८/०६/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता मे. शिंदखेडा न्यायालयात स्वत: अगर वकील प्रतिनिधी मार्फत कागदपत्रासह हजर होवून लेखी हरकती नोंदाव्यात. मुदतीत कोणाची काहीही हरकत न आल्यास अर्जाची एकतर्फा सुनावणी घेण्यात येवून अर्जदार परागंदाचे कायदेशीर वारस आहेत.असा कायदेशीरवारसांचा दाखला देण्याविषयी वारस प्रमाणपत्र देण्याविषयी पुढील योग्य तो आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी.कळावे.

सदरहू जाहीर नोटीस मे. न्यायालयाचे आदेशावरुन प्रसिद्धीस आपला महाराष्ट्र या वृत्त पत्रात दिली असे. शिंदखेडा दि. / /२०२६

सही:... सही...
**कामगिरी कारकून** (कोर्टाचा शिक्का) **सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय,
ता. शिंदखेडा जि. धुळे

## जाहीर नोटीस

**शिरपूर येथील मे.तहसिलदार सो.यांचे कोर्टात**

**.श्री. निलेश प्रविण सिसोदे,
उ. व. ३५, धंदा : नोकरी,
रा. खामखेडा प्र.था.पो.टेकवाडे, ता.शिरपूर जि.धुळे. ..अर्जदार**

**॥विरूध्द॥**

**ग्रामपंचायत अधिकारी सो.
ग्रामपंचायत खामखेडा प्र, था. ता. शिरपूर जि. धुळे .... जाबदेणार**

ज्याअर्थी अर्जदार नामे निलेश प्रविण सिसोदे यांचा जन्म दि. १०/०४/१९९१ रोजी मौजे खामखेडा प्र. था. ता. शिरपूर जि. धुळे येथे झाला असून, अर्जदार यास त्यांच्या जन्म दाखला मिळावा म्हणून जन्म/मृत्यू अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे अर्ज दाखल करावयाचा आहे. अर्जदारास जन्म दाखला शासकीय व निमशासकीय कामासाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांच्या जन्मासंबंधी कुणाची काही हरकत/आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणाची काहीही हरकत नाही, असे समजण्यात येईल. दि. १७/०४/२०२६.

सही...
**अॅड. महेश एस. वाघ**

## जाहीर नोटीस

नि. ७

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो. (ज्यु.डि.) यांचे कोर्टात**

दिवाणी कि.अर्ज नं. ३०२/२०२६

**१)शिलाबाई सुरेश गुजर, २) महेंद्र सुरेश गुजर
३) गिता योगेश चोधरी, ४) राजश्री संदीप पाटील
५) माधुरी संदीप पाटील, ६) वर्षा अमोल पाटील. ...अर्जदार**

॥विरूध्द॥

**कोणीही नाही** .... जाबदेणार
**कै.सुरेश हेमराज गुजर (मयत)**, (मृत्यू ता. २५/०२/२०२६)
रा. खर्दे (गुजर.) बु. ता. शिरपूर जि. धुळे ... **मयत**

ज्याअर्थी मयत सुरेश हेमराज गुजर हे दि. २५/०२/२०२६ रोजी मौजे सुरत, ता. जि. सुरत (गुजरात) येथे मयत झाले असून आता अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामांसाठी व अर्जदार व त्यांचे एक मुलगा व चार मुली असे एकूण सहा असे मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेग्युलेशन अधिनियम १८२७ कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसांसंबधी कुणाची काही हरकत /आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दि. ३०/०४/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा सदर प्रकरणी पुढील कार्यवाही करणेत येईल दि. १५/०४/२०२६

सही:... सही...
**कनिष्ठ लिपीक** (कोर्टाचा शिक्का) **सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायालय,शिरपूर जि. धुळे — दिवाणी न्यायालय,शिरपूर जि. धुळे

## जाहीर नोटीस

नि. ७

**शिरपूर येथील मे.सिव्हील जज्ज सो. (ज्युनि.डिव्ही.) यांचे न्यायालयात**

दिवाणी कि.अर्ज नं. ३१७/२०२६

**१) भोजुसिंग चंद्रसिंग राजपुत, २) चेतन भोजुसिंग राजपुत**
अ. नं. १ व २ रा.पळासनेर ता. शिरपूर जि. धुळे.
**३) सीमा जयपाल राजपुत रा. ७९, विश्रांती पार रामनगर, समोर,**
गोडदरा, सुरत नगर, सुरत (गुजरात)
**४) स्वपना दिपेन्द्रसिंग सिसोदिया,**रा. ३१८, दयानंद कॉलनी, गल्ली नं. २, नागडा जंक्शन ता. नागडा, जि. उज्जैन (म.प्र.)
**५) भाग्यश्री धनंजयसिंग सिसोदिया**
रा. होळ, ता. शिरपूर जि. धुळे.. ...अर्जदार

॥विरूध्द॥

**कोणीही नाही** .... जाबदेणार

ज्याअर्थी मयत पुष्पाबाई भोजुसिंग राजपुत हे दि. २८/०१/२०२६ रोजी मौजे पळासनेर ता. शिरपूर जि. धुळे येथे मयत झाले असून अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी मुंबई रेग्युलेशन अधिनियम १८२७ कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसांसंबधी कुणाची काही हरकत /आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दि. ०५/०५/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणाची काहीही हरकत नाही असे समजण्यात येवून अर्जदारांचा अर्ज मंजूर करण्यात येईल..दि. १५/०४/२०२६

सही:... सही...
**कनिष्ठ लिपीक** (कोर्टाचा शिक्का) **सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायालय,शिरपूर जि. धुळे — दिवाणी न्यायालय,शिरपूर जि. धुळे

## जाहीर समन्स

निशाणी नं. ६

**शिंदखेडा येथील मे.सिव्हील जज्स सो. ज्युनिअर. डिव्हीजन यांचे न्यायालयात**

दिवाणी कि.अर्ज नं. १३०/२०२६

**१) सुलोचना श्रावण गुरव वैगरे ९. ..अर्जदार**

॥विरूध्द॥

**कोणीही नाही.** ... जाबदेणार
सिताराम धनजी (धंजी) गुरव (चव्हाण) ... मयत
रा. शिंदखेडा ता. शिंदखेडा जि. धुळे.. . .... **मयत**

ज्याअर्थी अर्जदार नं. १ व २ यांचे सासरे अर्जदार नं. ३ ते ९ यांचे आजोबा, सिताराम धनजी (धंजी) गुरव (चव्हाण) हे दिनांक १९/२/१९८३ रोजी मौजे शिंदखेडा ता. शिंदखेडा जि. धुळे येथे मयत झाले. त्याअर्थी अर्जदारांना मयताचे वारस लावण्यासाठी तसेच वारसांना शासकीय, निमशासकीय कामासाठी मयताचा वारस दाखला लागणार असल्याने वारस दाखला मिळण्यासाठी अर्जदारांनी सदरील अर्ज दाखल केला आहे.

तरी ज्या कोणाची हरकत, तक्रारी असेल त्यांनी आपली हरकत,तक्रार स्वत: अगर वकीलामार्फत हजर होवून दि. २०/०६/२०२६ पावेतो सकाळी १०.३० वाजता कोर्टात मांडावी. तसे न केल्यास कोणाचीही काहीही हरकत नाही असे समजले जाईल व वरील वारसांच्या नावाने वारस दाखला देण्यात येईल.

आज रोजी आमचे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली असे.
दि. १८/३/२०२६

..सही... सही...
**कनिष्ठ लिपिक** (कोर्टाचा शिक्का) **सहा. अधिक्षक**
शिंदखेडा कोर्ट — शिंदखेडा कोर्ट

## जन्म/मृत्यू नोंदणीचा जाहीरनामा

## जाहीर नोटीस

**कार्यकारी दंडाधिकारी तथा अपर तहसिलदार दोंडाईचा जि.धुळे यांचे न्यायालय.**

क्र. कावि/दंडप्र/१५४/२०२६
तहसिलदार यांचे कार्यालय दोंडाईचा
दि. १५/०४/२०२६.

**मन्सुरी शरीफ बाबू
रा. साक्री ता. साक्री जि. धुळे ..अर्जदार**

॥विरूध्द॥

**नगरपरिषद दोंडाईचा ता. शिंदखेडा जि. धुळे. ... सामेवाला.**

ज्याअर्थी अर्जदार यांनी कायदेशीर जन्म नोंदणी मिळण्यासाठी अर्ज मे. कोर्टात केला असून त्या अर्जात अर्जदार नामे मन्सुरी शरीफ बाबु यांचा जन्म दि. ०१/०६/१९८४ रोजी नगरपरिषद दोंडाईचा ता. शिंदखेडा जि. धुळे येथे झाला आहे. मात्र अर्जदार यांचा जन्म तारखेची नोंद जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा नगरपरिषद दोंडाईचा ता. शिंदखेडा जि. धुळे येथे झाला आहे. मात्र अर्जदार यांची जन्म तारखेची नोंद जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा नगरपरिषद दोंडाईचा ता. शिंदखेडा जि. धुळे येथे करण्यात आलेली नाही. नगरपरिषद दोंडाईचा यांनी दप्तरी नोंद आढळून येत नसल्याबाबत दाखला दिलेला आहे. अर्जदार यांनी त्यांची जन्माची नोंद होणेकामी इकडील न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार यांची जन्माच्या तारखेची नोंदणी शासकीय/निमशासकीय कामासाठी आवश्यक असल्याचे अर्जदार यांनी वा कोर्टात सदरहू जन्माची नोंदणी करुन मिळणेबाबत अर्ज केलेला आहे.

सदरहू अर्जदार यांची जन्म नोंदणी बाबत हरकत असल्यास ह्या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याच्या आत त्याने कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्या आणि ह्या लेख्यावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती दाखवल्या नाहीत तर सदरहू कोर्ट अर्जदार यांचे मागणीनुसार जन्म नोंदणीबाबत लागलीच पुरावा देऊन नोंदणी शाबीत असल्यास अर्जदार यांची जन्माची नोंदणीबाबत आदेश देण्यात येईल.

आज दि. १५/०४/२०२६ रोजी माझ्या सहीनं व मे. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे. .

सही...
(शिक्का) **प्र. अपर तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, दोंडाईचा**

## जाहीर नोटीस

नि. ७

**धुळे येथील मे.सिव्हील जज्ज सो. ज्युनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात**

दिवाणी कि.अर्ज नं. ३८७/२०२६

**१) लक्ष्मी चेतन निकुंभ, २) तन्मय चेतन निकुंभ
३)देवांशी चेतन निकुंभ** सर्व रा. गुरु. गोविंद प्लॉट, सोनगीर ता.जि. धुळे.
(अर्जदार नं. १स्वत:साठी व अर्जदार नं. २ व ३
यांची अ. पाक आई म्हणून . ...अर्जदार

॥विरूध्द॥

**कोणीही नाही** .... जाबदेणार

X

**कै. चेतन साहेबराव निकुंभ(माळी)** (मृत्यू ता.२४/०२/२०२६)
रा. गुरु गोविंद प्लॉट सोनगीर, ता. .जि. धुळे. ... **मयत**

ज्याअर्थी मयत चेतन साहेबराव निकुंभ(माळी) हे दि. २४/०२/२०२६ रोजी मौजे सोनगीर ता. जि. धुळे येथे मयत झालेले असून, अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी .मुंबई रेग्युलेशन अधिनियम १८२७ कलम २ अन्वये अर्ज दाखल केला आहे. अर्जदारांना सदरचा वारस दाखला शासकीय व निमशासकीय तसेच औपचारीक कामासाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी सर्व संबंधितांना सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील मयत व त्यांच्या वारसांसंबधी कुणाची काही हरकत /आक्षेप असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत दि. १५/०६/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता हजर होवून हरकत/आक्षेप सादर करावा. अन्यथा सदर प्रकरणी पुढील कार्यवाही करणेत येईल दि. १५/०४/२०२६

सही:... सही...
**कनिष्ठ लिपिक** (कोर्टाचा शिक्का) **सहा. अधिक्षक**
दिवाणी न्यायालय,धुळे जि. धुळे — दिवाणी न्यायालय,धुळे जि. धुळे

## जाहीर नोटीस

नि. ७
**अॅड. निलेश पी. कुलकर्णी,**
धुळे फो. नं. ९५८८४१३६९२

**शिरपूर येथील मा.दिवाणी न्यायाधिश सो. क. स्तर यांचे न्यायालयात**

दिवाणी कि.अर्ज नं. ३२१/२०२६

**१) श्रीमती सुरेखा राजेंद्र वाडिले,२) चेतन राजेंद्र वाडिले.
३) वर्षा संदीप जावरे,४)प्रियंका केतन टिकोने,**
सर्व रा. थाळनेर, ता. शिरपूर जि. धुळे. .. ..अर्जदार

॥विरूध्द॥

**कोणीही नाही** .... **सामनेवाला.**

३३३३३३

कै. राजेंद्र भटू वाडिले (मयत) मृत्यू दि. १०/११/२०२२
मृत्यू ठिकाण : थाळनेर ता. शिरपूर जि. धुळे. ... मयत

ज्याअर्थी अर्जदार यांनी उपरोक्त न्यायालयात कै. राजेंद्र भटू वाडिले (मयत) यांचे अर्जदार नं. १ ते ४हे कायदेशीर वारस असून वारस दाखला हा शासकीय, निमशासकीय इतर खाजगी कामासाठी तसेच वेळोवेळी आवश्यक त्या ठिकाणी वारस दाखला आवश्यक असून तसा वारस दाखला मिळणेसाठी दि. /२०२६ रोजी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौ. दि. ७/५/२०२६ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस,हितचिंतक, वारस, वगैरे संबंधितांना कळविण्यात येते की,याबाबत काही वाद असल्यास शिरपूर येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो.क.स्तर, कोर्ट नं. यांचे न्यायालयात उक्त निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.ठिकाण : शिरपूर दि. १५/४/२०२६.

सही:... सही...
**कामगिरी कारकुन** (कोर्टाचा शिक्का) **अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, सो. क.स्तर शिरपूर. — दिवाणी न्यायालय,सो. क.स्तर शिरपूर

## पान १ वरुन

## मनुष्याच्या जीविताला धोका

खूप जास्त वाढते. अध्ययन म्हणते की, या स्थितीत उत्तर भारतात दमट उष्णतेची लाट चालण्याची शक्यता सामान्यापेक्षा सव्वाशे ट्क्क्यापर्यंत वाढते. अध्ययनानुसार, घातक दमट उष्णतेसाठी मान्सूनची अंतर्गत हालचाल जबाबदार आहे. याला बोरेल समर इंट्रासीझनल ऑसिलेशन म्हटले जाते.

**ब्रेक मान्सूनमध्ये द्वीपकल्पीय धोका**

जेव्हा मान्सून ब्रेक फेज मध्ये जातो, तेव्हा पाऊस थांबतो आणि ढग विरळ होतात. ज्यामुळे सूर्याची थेट उष्णता वाढते. पाऊस तर थांबतो, पण हवेतील आर्द्रता नाहीशी होत नाही. ती तिथेच टिकून राहते. ही ती वेळ असते जेव्हा केरळ आणि दक्षिण भारतातील इतर राज्ये सर्वात अधिक असुरक्षित होतात.

**केरळमध्ये दिवस-रात्रीही गरम**

केरळमध्ये दिवस उष्ण होण्यासोबतच रात्रीही गरम होत आहेत. यामुळे शरीराला सावरण्यासाठी कमी वेळ मिळतो. शहरांमध्ये उष्णता जास्त वेळ राहते व सागरी वारे आधीसारखे राहिले नाहीत. अशा परिस्थितीत जर तापमान उष्णतेच्या लाटेच्या मान्य मर्यादेपेक्षा खाली असेल, तरीही लोकांना गंभीर त्रास होत आहे.

**वेट-बल्ब जास्त योग्य निकष**

अनेक शास्त्रज्ञ वेट-बल्ब तापमानाला विश्वसनीय मानतात. हे उष्णता आणि आर्द्रता दोन्ही जोडून धोका सांगते. वेट-बल्ब तापमान पस्तीस अंश सेल्सिअस झाले, तर सावलीत बसलेला निरोगी माणूस देखील सहा तासांत धोक्यात येऊ शकतो. कारण अशा वेळी शरीर स्वत:ला थंड करण्यास पूर्णपणे असमर्थ ठरते.

**वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता**

सध्याच्या हवामान अंदाजानुसार एप्रिल रोजी पश्चिम महाराष्ट्रातील घाट परिसर, तसेच उत्तर खान्देश आणि दक्षिण मराठवाड्यातील काही भागांमध्ये दुपारनंतर वादळी पावसाची शक्यता आहे. त्यानंतर आणि एप्रिल रोजी पावसाच्या क्षेत्रात वाढ होण्याचे संकेत आहेत, ज्यामुळे पश्चिम महाराष्ट्रासह (पुणे विभाग) मराठवाडा (प्रामुख्याने दक्षिण भाग आणि छत्रपती संभाजीनगर विभाग) आणि विदर्भात (प्रामुख्याने अमरावती विभाग) देखील काही प्रमाणात वादळी पाऊस पडेल. मात्र तारखेला वादळी पावसाच्या क्षेत्रात आणि तीव्रतेत घट होईल.

कृषी विभागाकडून शेतकऱ्यांना आवाहन करण्यात येते की, हवामान बदल लक्षात घेऊन तातडीने योग्य ती प्रतिबंधात्मक उपाययोजना करावी. शेतीची कामे हवामानानुसार नियोजित करावीत. काढणी केलेली पिके सुरक्षित ठिकाणी साठवावीत. वादळी वारे, पाऊस आणि संभाव्य गारपीट यापासून पिकांचे नुकसान टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी. शेतमाल, भाजीपाला व इतर काढणी केलेले उत्पादन मोकळ्यावर ठेवू नये.

## राज्यात १७ लाख कर्मचारी..

कॅशलेस आरोग्य विमा योजना लागू करणे. सुधारित राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेबाबत स्पष्ट नियम जाहीर करणे, एक मार्च २०२४ पासून निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना तात्पुरते निवृत्ती वेतन देणे, तसेच सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत लाभ देणे. याशिवाय, निवृत्तीचे वय साठ वर्षे करण्याची मागणीही पुन्हा जोर धरत आहे.जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करणे, नगरपालिका व नगरपरिषदांतील कर्मचाऱ्यांच्या आकृतीबंधाचा प्रश्न सोडवणे, तसेच दीर्घकाळ कंत्राटी पद्धतीवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना नियमित सेवेत घेणे या मुद्द्यांवर तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी संघटनांनी केली आहे. मात्र, या मागण्यांवर अद्याप कोणताही ठोस निर्णय न झाल्याने कर्मचारी संघटनांनी आता आंदोलनाचे हत्यार उपसले आहे. एकवीस एप्रिलपासून सुरू होणाऱ्या या संपामुळे राज्यातील सरकारी कार्यालयांचे कामकाज पूर्णपणे ठप्प होण्याची शक्यता आहे.

## शिरपुरमध्ये जय्यत तयारी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे २५ एप्रिलला दुपारी तीनला हेलिकॉप्टरद्वारे शिरपूर विमानतळावर आगमन होणार आहे. तेथून दुपारी ३.३५ वा ते टेक्सटाईल पार्क क्षेत्रातील दहिवद येथील एस.व्ही.के.एम. इंजिनिअरींग कॉलेजचे उद्घाटन करुन पाहणी करतील. दुपारी ३.४८ वा.कृष्णा कॉटेक्स (वर्ल्ड क्लास) व डाय हाऊस येथे आगमन, उद्घाटन व पाहणी करतील. दुपारी ४.२१ वाजता प्रथ टेक्सटाईल व एसेरोला येथे आगमन, उद्घाटन व पाहणी करतील. सायंकाळी ४.५६ वा. खर्दे बु. येथील नर्सिंग कॉलेजचे उद्घाटन करतील. सायंकाळी ५.०८ वा.स्व. तपनभाई पटेल मेमोरीयल हॉस्पिटलचे उदघाटन ते करणार आहेत. सायंकाळी सातला आर.सी.पटेल फॉर्मसी कॉलेज ग्राऊंड येथे जाहीर कार्यक्रमास उपस्थित राहतील. या कार्यक्रमासाठी सुमारे ३५ हजार जणांची उपस्थिती गृहित धरुन नियोजन करण्यात आले आहे. याच कार्यक्रमातून व्हर्च्युअल यंत्रणेद्वारे तरडी येथील ॲग्रीकल्चर कॉलेज व फॉर्मसी कॉलेज, शहरातील आर.सी.पटेल इंग्लिश स्कूलचे उद्घाटन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात येणार आहेत. त्यासोबतच व्हर्चुअल पद्धतीने नटवाडे येथील देवमोगरा माता मंदीर, दहिवद (ता.शिरपूर) येथील इंटरनॅशनल मोटार ड्रायव्हींग स्कूल यांच्या वास्तूंचे भूमिपूजन ना.फडणवीस यांच्याहस्ते करण्यात येणार आहे.

ड्रीम प्रोजेक्ट हॉस्पिटल : शिरपूरचे आ.अमरीशभाई पटेल हे मुख्यमंत्र्यांचे अत्यंत निकटचे लोकप्रतिनिधी म्हणून ओळखले जातात. शिरपूरसह मुंबई येथील आ.पटेल यांच्या अधिपत्याखालील संस्थांच्या विविध कार्यक्रमांना मुख्यमंत्र्यांची नियमित उपस्थिती असते. कोरोना संक्रमण कालावधीत रुग्णांवर ओढवलेल्या परिस्थितीचे अवलोकन केल्यानंतर आ.पटेल यांनी हॉस्पिटल उभारण्याचा संकल्प करुन तो पूर्ण केला आहे. शिरपूर शहरातील अरुणावती नदी काठावरील शनी मंदिर परिसरात खर्दे बुद्रुक शिवारात आ.पटेल यांनी उभारलेल्या हॉस्पिटल मार्फत रुग्णांना अतिशय चांगल्या, अत्याधुनिक आरोग्य सेवा सुविधा देण्यात येणार आहेत. पहिल्या टप्प्यात ३५० बेडचे हॉस्पिटल सुरू करण्यात येत आहे. अनेक प्रकारच्या आजार व रोगांवर या हॉस्पिटलमध्ये उपचार केले जाणार असल्याने व देशभरातील नामांकित डॉक्टर्स मार्फत उपचार मिळणार असून गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियादेखील करण्यात येणार आहेत. अमरीशभाईंचा ड्रीम प्रोजेक्ट असलेल्या या प्रकल्पामुळे शिरपूर आता आरोग्यधाम या नावाने प्रसिद्ध होण्यासाठी सज्ज झाले आहे.

## एकवीरा देवी मंदिराच्या जिर्णोध्दारास वेग

प्रवेशद्वार शहराचे लक्ष वेधून घेते. स्थापत्य कलेचा उत्तम नमुना म्हणून या प्रवेशद्वाराकडे पाहिले जाते. दुसऱ्या टप्प्यात नेहरूनगर परिसरात उभारण्यात आलेली स्वागत कमान देखील शहराच्या सौंदर्यात भर घालत आहे. काही दिवसात स्वागत कमानीवर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात येणार आहे. तिसऱ्या टप्प्यात एकवीरा देवीच्या मंदिराचा मुख्य गाभारा आणि सभा मंडपाचे नूतनीकरण करण्यात येत आहे. सभा मंडपात ग्रॅनाईट आणि मार्बलचा वापर करून आकर्षक पद्धतीने सभामंडपाचे नूतनीकरण करण्यात येणार आहे. दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना आध्यात्मिक ऊर्जेची अनुभुती यावी. शुभ स्पंदनांचा लाभ व्हावा, या उद्देशाने गाभाऱ्याचे आकर्षक पद्धतीने नूतनीकरण करण्यात येत आहे. गाभारा आणि सभा मंडप विकास कामांचे भूमिपूजन वंजारी समाजाचे अध्यक्ष भीमराव गोरे यांच्या हस्ते झाले. अक्षयतृतीयेला सुरू केलेल्या शुभकार्याचा कधीही क्षय अर्थात नाश होत नाही. ते कार्य शाश्वत आणि चिरकाल टिकून राहते या शुद्ध आणि पवित्र भावनेतून मंदिराच्या विकास कामाचे भूमिपूजन झाले. याप्रसंगी जिल्हाप्रमुख अतुल सोनवणे, एकवीरा देवी मंदिराचे अध्यक्ष सोमनाथ गुरव, जिल्हा उपप्रमुख नरेंद्र परदेशी, तेजस गोटे, गुलाब गोरे, पंकज मुर्तडक,शेखर वाघ, प्रवीण मुर्तडक, पंकज भारस्कर, सागर साळवे, धनंजय दीक्षित, स्वप्नील सोनवणे, सुरेश तारगे, मनोज गवळी, विनोद रनमळे, सौरभ जवराळ, योगेश गोरे, पवन खांडरे, अमोल गोरे ,पवन सरग, प्रतिक गोरे, विशाल ढेकळे, जयवंत गोरे, सोनू खांडरे, ज्ञानेश्वर देवरे, जयेश पवार, विकी गर्ग,भरत गोरे, आशू भडागे, एकवीरा देवी मंदिराचे विश्वस्त संजय गुरव, मनोहर गुरव,नंदलाल सोनवणे,महेश गुरव,सदाशिव पुजारी, बलवंत गुरव यांच्यासह अनेक जण उपस्थित होते.

## पान १ वरुन

## धुळ्यात आज लोकशाही दिन

लोकशाही दिनाचे अर्जाचा नमुना जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, प्लॉट नं. ५२, जयहिंद कॉलनी, देवपुर, धुळे येथे मिळतील. अर्ज विहित नमुन्यात असावा, तक्रार/निवेदन हे अर्जदाराचे वैयक्तिक असावे. तसेच न्यायप्रविष्ठ प्रकरणे, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती न जोडलेले अर्ज, सेवा विषयक, आस्थापना विषय अर्ज/तक्रार/निवेदन तसेच पोस्टाने पाठविलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. असे भामरे यांनी कळविले आहे.

## चिकुनगुनियाच्या उद्रेकाने भीती

जवळपास दहा नागरिकांना हा त्रास झाला. त्यांनी खासगी रूग्णालयात उपचार घेतल्यानंतर त्यांच्यात चिकुनगुनियाची लक्षणे असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. गेल्या तीन दिवसात हीच लक्षणे दिसणाऱ्या नागरिकांची संख्य शंभरावर गेली. धमाणे येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला याबाबत माहिती देण्यात आली. नागरिकांना होत असलेला त्रास लक्षात घेता आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी उपचारासाठी गावात दाखल झाले. दरम्यान, गावकऱ्यांच्या मदतीला शिवसेनेचे जिल्हा प्रमुख शाहणा सोनवणे आणि त्यांचे सहकारी धावले. आरोग्य अधिकारी बिपीन सोनवणे यांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून सकाळ पासून सायंकाळी पर्यंत गावात राहून तपासणी आणि उपचार सुरू केले आहेत. तालुका आरोग्य अधिकारी रुचिरा पवार यांनी भेट देऊन आरोग्य पथकाला उपचाराविषयी सुचना दिल्या आहेत. विशेष म्हणजे आरोग्य सेवक दिपक पाटोळे यांनाही या आजाराची लागण झाली आहे. ग्रामपंचायत प्रशासनाने नागरीकांचे आरोग्य सुरक्षित रहावे, यासाठी सांडपाणी आणि कचरा व्यवस्थापन करणे, पिण्याचे पाणी सुरक्षित कसे राहिल, याबाबत माहिती देण्यास सुरूवात केली आहे. गावात चिकुनगुनियाचा उद्रेक झाला असला तरी जिल्हा आरोग्य यंत्रणा आणि लोकप्रतिनिधींनी गांभीर्याने घेतले नाही, असे म्हणत काहींनी नाराजी व्यक्त केली. नवी आच्छी गावातील परिस्थितीत सुधारणा व्हावी यासाठी आणि नागरिकांचे मनोधैर्य टिकून रहावे, यासाठी शिवेसना पदाधिकारी काम करीत आहेत. त्यात शिवसेना जिल्हा प्रमुख शाहणा सोनवणे, जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या सुनिता सोनवणे, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष रावसाहेब ईशी, सखाराम ईशी, नाना ईशी, बळीराम ईशी, रावसाहेब सोनवणे, बापु ईशी, दादु बैसाणे, बळीराम मोहने, मुकेश सोनवणे, बबलु ईशी, विजय ईशी, प्रविण सोनवणे, चेतन ईशी, पोलिस पाटील छगन बैसाणे यांचा समावेश आहे.

## पाच कोटीचा निधी मंजूर

पूर्ण इतिहास सांगितला. अखिल विश्व भोपे पुजारी महानुभाव समाज अध्यक्षपदी प्रभाकर भोजने यांची निवड झाल्याने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी महंत बिडकर बाबा (रणाईचे) माजी आमदार बाळासाहेब सानप, प्रकाश नन्नवरे, प्रभाकर भोजने, दत्तात्रय गवळी (नाशिक) शेंदुर्णीचे नगराध्यक्ष गोविंद अग्रवाल, अरुण महानुभाव यांच्यासह उत्तर महाराष्ट्रातील महानुभाव पंथीय निवडून आलेल्या नगरसेवक, नगराध्यक्ष, भोपे पुजारी समाजातील गुणवंत विद्यार्थी प्रशासकीय अधिकाऱ्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला महंत आंबेकर बाबा, महंत भीष्माचार्य बाबा, महंत पाथरीकर बाबा, महंत खामनिकर बाबा (कनाशी) आदी संत महंत यावेळी उपस्थित होते.

## अक्षयतृतीयाचे घरोघरी पुजन

सोन्याचे बिस्कीट आणि चांदीच्या वीटांची खरेदी केली. यावर्षी सोन्या-चांदीच्या दराने आकाशाला गवसणी घातली. सराफ बाजारात सोन्याचा दर प्रति दहा ग्रॅमला एक लाख ५४ हजार चारशे रूपये होता. त्यावर तीन टक्के जीएसटी स्वतंत्रपणे आकारला जात आहे. दुसरीकडे चांदीनेही मोठी झेप घेतली. चांदीचा दर दोन लाख साठ हजार रुपये प्रति किलोवर पोहोचला. त्यावर अतिरिक्त तीन टक्के जीएसटी लागू आहे. दरवाढ होऊनही मुहूर्तावर सोने-चांदी खरेदी करणाऱ्यांचा उत्साह कमी झाला नाही. वाढत्या महागाईतही नागरिकांनी सण आणि परंपरेचा आनंद द्विगुणित करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर सोने, चांदीची खरेदी केली. त्यामुळे सराफ व्यावसायिकांमध्येही समाधानाचे वातावरण होते.

## इंग्लिश स्कूलच्या चौकशीचे आदेश

कोणतीही पावती किंवा पुरावा शिल्लक राहू नये. सांस्कृतिक कार्यक्रमांच्या नावाखाली सक्तीने वसुली केली जाते. जे विद्यार्थी पैसे देण्यास नकार देतात, त्यांचे अंतर्गत गुण कापण्याची धमकी दिली जाते. नियमाबाह्य फी आकारणे, विद्यार्थ्यांचा मानसिक छळ करणे आणि शाळेत विद्यार्थी सुरक्षेचा अभाव असणे अशा बाबी तक्रारीत नमूद असून शाळेच्या कारभारावर गंभीर ताशेरे ओढले आहेत. शासकीय नियमांनुसार (शासन निर्णय दि.११ जून २००४ व १ जुलै २०२५), कोणत्याही शाळेला विशिष्ट दुकानातून शैक्षणिक साहित्य खरेदी करण्याची सक्ती करता येत नाही. मात्र, सदर स्कूलमध्ये या नियमांचे सरळ-सरळ उल्लंघन होत असल्याचे पत्रात म्हटले आहे. नंदुरबार जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे. त्यांनी शहादा येथील गटशिक्षण अधिकाऱ्यांना आदेश दिले आहेत की, या सर्व तक्रारींची वस्तुनिष्ठ आणि सखोल चौकशी करण्यात यावी. चौकशीचा लेखी अहवाल २१ एप्रिल २०२६ पर्यंत कोणत्याही परिस्थितीत सादर करावा. या प्रकरणासाठी आता कोणतेही स्मरणपत्र दिले जाणार नाही, याची स्पष्ट नोंद घेण्याचेही आदेशात बजावण्यात आले आहे. आता एप्रिल रोजी सादर होणाऱ्या अहवालात काय निष्पन्न होते आणि दोषींवर काय कारवाई होते, याकडे सर्व पालकांचे लक्ष लागले आहे.

## धुळ्यात दामा पुरस्कारांचे वितरण

अध्यक्ष डॉ.रवी वानखेडकर, डॉ. चंद्रमोहन सैंदाणे, डॉ. जगदीश पाखरे, आय.एम.ए. धुळेचे अध्यक्ष डॉ.मनीष जाखेटे, दामाचे अध्यक्ष डॉ.दीपक शेजवळ, डॉ.प्रदीप सोनवणे, डॉ.योगेश ठाकरे यांच्यासह शहरातील अनेक मान्यवर डॉक्टर उपस्थित होते.यावेळी उपस्थित मान्यवरांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा ज्योतिबा फुले यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांची आजच्या समाजात असलेली गरज अधोरेखित केली. कार्यक्रम उत्साहात पार पडून सामाजिक व वैद्यकीय क्षेत्रातील योगदानाचा सन्मान करण्यात आला.

## एकाच ठिकाणी सोळा योजनांचा लाभ

लोटन पाटील, पप्पू शिंदे, पुरवठा निरीक्षण अधिकारी नितीन नंदावार, सुरेश कुंभार, दिगंबर वाणी, सचिन राजपूत, मुकेश सोनवणे, जयपाल गिरासे, पराग पवार यांच्यासह अनेक जण उपस्थित होते. समाधान शिबिराबाबत ग्राम महसूल अधिकारी तुषार पवार यांनी शासकीय योजनांची माहिती दिली. विविध आठ विभागाचे स्वतंत्र स्टॉल उभारण्यात आले होते. या स्टॉलच्या माध्यमातून नागरिकांना विविध दाखले, शासकीय योजनांचे अर्ज आणि तांत्रिक मार्गदर्शन करण्यात आले. याप्रसंगी विरदेल मंडळातील विरदेल, आच्छी, हिसपुर,अमळथे, वरपाडे, नेवाडे,सोनेवाडी या गावातील नागरिकाना विविध दाखल्यांचे वाटप करण्यात आले. गरोदर महिलांना बेबी केअर कीट, संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ योजना, इंदिरा गांधी वृद्धपकाळ योजना आणि राष्ट्रीय कुटुंब अर्थसहाय्य योजनेतील लाभ देण्यात आला. रेशन कार्ड, सातबारा उतारे, फेरफार नोंद, जातीचे दाखले, उत्पन्न दाखले देण्यात आले. नायब तहसीलदार शारदा बागले, विजय गोस्वामी, पुरवठा निरीक्षण अधिकारी नितीन नंदावार,कृषी विभागाचे सचिन राजपूत यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. कृषी विभागाच्या यांत्रिकीकरण योजनेचा तेरा लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला. कृषी विभागाच्या स्टॉलला जवळपास दीडशे शेतकऱ्यांनी भेट दिली. शिबीर यशस्वी होण्यासाठी मंडळ अधिकारी सोनाली चव्हाण, तलाठी आशिष मडोळे, श्रीकांत साळुंखे, शुभम गोडे, वैष्णवी मानकर, महसूल सेवक सुमित कदम यांनी विशेष परिश्रम घेतले. सूत्रसंचालन ज्योती निकवाडे यांनी तर आभार तुषार पवार यांनी मानले.

# खासदार निशिकांत दुबे यांचा धुळ्यात युवा सेनेकडून निषेध

**धुळे, दि.१९- संसदेमध्ये शिवसेना नेते आणि युवासेना प्रमुख आणि आमदार आदित्य ठाकरे यांच्याबद्दल भाजप खासदार निशिकांत दुबे यांनी बेजबाबदार विधाने केली. दुबे यांनी केवळ प्रसिद्धी मिळवण्यासाठी आदित्य ठाकरे यांच्यावर खोटे आरोप केले आहेत. खासदार दुबे यांच्या कृत्याचा आम्ही जाहीर निषेध करतो. खासदार दुबे यांनी जाहीर माफी मागावी, अशी मागणी शिवसेना कार्यकर्त्यांनी केली. त्यासाठी धुळ्यात शिवनेरी चौकात शिवसैनिकांनी खासदार दुबे यांचा निषेध नोंदविला.**

संसदेचे अधिवेशन सुरू आहे. त्यावेळी सभागृहात बोलतांना भाजप खासदार निशिकांत दुबे यांनी युवासेना प्रमुख आणि आमदार आदित्य ठाकरे यांच्याबाबत आक्षेपार्ह विधाने केली. त्याचे महाराष्ट्रात पडसाद उमटत आहेत. धुळ्यात शिवसेना आणि युवा सेनच्या पदाधिकाऱ्यांनी दुबे यांचा निषेध केला. शहरातील शिवनेरी चौकात एकत्र आलेल्या कार्यकर्त्यांनी खासदार दुबे यांचा निषेध नोंदविला. संसदेत खासदार दुबे यांची विधाने पाहिली तर त्यांची वैचारिक दिवाळखोरी झाली आहे, असे दिसते. पवित्र सभागृहाचा वापर दुबे यांनी व्यक्तीव्देषासाठी केला आहे. त्यांच्यावर केंद्र सरकारनेच कारवाई केली पाहिजे. आदित्य ठाकरे यांची वाढती लोकप्रियता आणि त्यांचे जनहितार्थ कार्य पाहून बिथरलेल्या सत्ताधाऱ्यांकडून खालच्या पातळीचे राजकारण केले जात आहे. आमच्या नेत्यावर केलेले चिखलफेकीचे प्रयतक आम्ही कदापी सहन करणार नाही, अशा शब्दांत युवासैनिकांनी संताप व्यक्त केला. प्रसिद्धीच्या झोतात राहण्यासाठी आदित्य ठाकरेंसारख्या सुसंस्कृत नेत्यावर चिखलफेक करणे अत्यंत निंदनीय आहे, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. यावेळी युवासेना विस्तारक कुणाल कानकाटे, शहर संघटक गोपी चव्हाण, गोलू मुर्तडक, अभिषेक नगरे हर्षल साळुंखे, चेतन शिंदे, जयेश नाईक, प्रेम कानकाटे,भटू शेटे, राज चव्हाण, मीर जैन,पप्पू चौधरी, दादू पाटील यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## पान १ वरुन

## राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता..

उपक्रमांमुळे प्रशासन अधिक सक्षम व परिणामकारक ठरले आहे. मंगळवार, २१ एप्रिल रोजी मुंबई येथील सह्याद्री अतिथिगृह येथे आयोजित समारंभात या पारितोषिकांचे वितरण करण्यात येणार आहे. या समारंभास राज्यातील विविध विभागांतील विजेते अधिकारी उपस्थित राहणार आहेत. या यशामुळे नंदुरबार जिल्हा व तळोदा तालुक्यातील प्रशासनिक यंत्रणेला नवे बळ मिळाले असून, अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. भविष्यातही अधिक गतिमान, पारदर्शक व जनहितकारी प्रशासन देण्यासाठी या गौरवातून प्रेरणा मिळणार असल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे.

## नंदुरबारमध्ये यंदाही अनोखी परंपरा

प्रमाणात कमी झाली असली तरी माळीवाड्यातील तरुणांनी ती जपली आहे. नियमित व्यायाम, ताकद आणि चिकाटीच्या जोरावर युवक या स्पर्धेत उत्साहाने सहभागी होतात. या दिवशी पुरणपोळी व आमरसाचा नैवेद्य अर्पण करण्याचीही प्रथा आहे, ज्यामुळे या परंपरेला धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व लाभते. ज्याच्यात ताकद आणि मेहनत, त्यालाच मिळते काम आणि मान अशीच ही परंपरा आजही तरुणांनी जिवंत ठेवली आहे.

## निधन वार्ता

### दौलतराव अहिरे



धुळे दि.१९- शिरुड येथील सेवानिवृत्त शिक्षक दौलतराव वामन अहिरे (डी.व्ही.सुतार सर) (वय ८५) यांचे काल वार्धक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, जावई नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्यावर आज शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. दिशा कन्स्ट्रक्शनचे संचालक रोटरी क्लब धुळे क्रॉस रोडचे माजी अध्यक्ष इंजि.दीपक अहिरे व इंजि. रवींद्र अहिरे यांचे वडील होत.


**पाहिजेत**

१) पेट्रोल पंपावर पेट्रोल/डिझेल भरण्यासाठी मुले/मुली पाहिजेत.
२) हुशार व अनुभवी ड्रायव्हर पाहिजे.
योग्य पगार दिला जाईल.
-: संपर्क :-
9823210266

**पाहिजेत**

हॉस्पिटल कामासाठी अनुभवी कर्मचारी लागणार आहेत.
किमान अनुभव १ वर्ष
रिसेप्शन-२
जनरल ड्यूटी-२
पुरुष किंवा महिला
साफसफाईसाठी मावशी
सिद्धहस्त ॲक्सिडेंट हॉस्पिटल
जीटीपी स्टॉप, देवपूर, धुळे
7821915567
8625030335
9021308536

**पाहिजेत**

जाधव बंधु ट्रॅक्टर्स
MASSEY FERGUSON
AUTHORISED DEALER
TAFE & MASSEY-FERFUSON Tractors
पुरुषोत्तम नगर, हॉटेल रसराजच्या बाजुला, देवपूर, धुळे
आमच्या नामांकित मॅसे फर्ग्युसन ट्रॅक्टर्स डिलरशिपसाठी खालीलप्रमाणे पदे भरावयाची आहेत.
कॉम्प्युटर ऑपरेटर -२
(डाटा एन्ट्री व ऑनलाईन कामाचा अनुभव आवश्यक)
सेल्स एक्झीकेटिव्ह - ४
(ट्रॅक्टर्स विक्रीचा अनुभव असल्यास प्राधान्य, लायसेन्स पाहिजे)
ट्रॅक्टर मॅकेनिकल - २
हेल्पर - २
योग्य व्यक्तिमत्व, नोकरीची गरज व योग्य शैक्षणिक पात्रतेच्या उमेदवारांनी खालील ठिकाणी अधिक माहितीसाठी समक्ष भेटा!
संपर्क मो.९४२२७५२५५७

**पाहिजेत**

मेडीकल एजन्सीमध्ये कामा साठी मुले/मुली पाहिजेत.
१) कॉम्प्युटर ऑपरेटर/अकौन्टंट
२) सेल्समन बाहेरगावासाठी
३) मदतनीस-हेल्पर
-: संपर्क :-
8408332975
9422287821

**पाहिजेत**

पाण्याचे जार वाटपसाठी माणसे पाहिजेत.
आकर्षक पगार मिळेल
समक्ष भेटा!
बुऱ्हानी आईस फॅक्टरी
यल्लमा देवी मंदिरासमोर, मालेगावरोड, धुळे
8208755681

**प्लॉट विकणे**

दुध डेअरी रोडजवळ केदार सिटी आणि विमलनाथ नगर मध्ये लहान प्लॉट विकणे आहेत.
डि.आर.प्रॉपर्टीज
9422289693

**विकणे आहे**

XUV-500 महिंद्रा कंपनीची ४ व्हीलर गाडी, मॉडेल W8 2012 आणि होंडा कंपनीची टू व्हीलर एक्टिवा गाडी 2016 विकणे आहे.
डि.आर.प्रॉपर्टीज
9422289693

**शेत जमीन विकणे**

महिंदळे शिवार, सुरत बायपास, हॉटेल चंद्रदिप समोर, शांतुषा नगरला लागून व बालाजी नगरच्या पाठीमागे २० आर yello Zone प्लॉटींगची शेत जमीन योग्य किंमत आल्यास त्वरित विकणे आहे.
संपर्क :- 7290999900

**पाहिजेत**

दुकान कामासाठी हुशार व होतकरुमुले अर्जंट पाहिजेत.
अनमोल पुस्तकालय
फुलवाला चौक, आग्रारोड,धुळे

**पाहिजेत**

Receptionist व Compunder व Multipurpose कामासाठी माणूस पाहिजे.
-: संपर्क :-
9420536444
9637233245

**शेती पाहिजे**

धुळे शहराच्या लगत २० एकर बागायत शेती पाहिजे. संपर्क करा.
वेळ ११ ते ५
8390997836

**फ्लॅट विकणे**

2 BHK ग्राऊंड फ्लोअर फ्लॅट, १०० फुटी रोड, समता नगर जवळ, शासकीय डेअरी समोर, धुळे
एल.जी.प्रॉपर्टीज् ब्रोकर
9793093955

**पाहिजे**

Require Fully Train Pharmacist
9823833108





हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०